# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः07.11.2025** **वारःशुक्रवार**

---

1. 'वंदे मातरम्' या देशभक्तिपर गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षांचं आज पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन
2. बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात विक्रमी 64 पूर्णांक 66 टक्के मतदान
3. भारताला मोठ्या आणि जागतिक दर्जाच्या बँकांची गरज असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितरामण यांचं प्रतिपादन
4. भारताच्या गौरवशाली हॉकी खेळाचा शतकोत्सव; देशभरात 14शे सामन्यांचं आयोजन

आणि

5. भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यानच्या, वीस षटकांच्या मालिकेतील चौथ्या सामन्यात, भारताचा ऑस्ट्रेलियावर 48 धावांनी विजय; मालिकेत 2-1 अशी आघाडी

**<u>वंदेमातरम्</u>**

देशप्रेमाचं प्रतीक असलेल्या वंदे मातरम् गीताच्या 'शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी' वर्षांचं उद्घाटन आज दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या निमित्ताने, देशभरात वर्षभर विविध कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते विशेष टपाल तिकीट आणि नाण्याचं प्रकाशन होणार आहे.
मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत, मंत्रालयातल्या त्रिमूर्ती प्रांगणात आज सकाळी १० वाजता 'वंदे मातरम्'चं समूहगान होणार आहे. वंदे मातरम् 'सार्ध शताब्दी' महोत्सवाच्या माध्यमातून पुढील वर्षभर, राज्यभरात कौशल्य विकास विभागाच्या वतीनं विविध कार्यक्रम होणार असल्याची माहिती मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

राज्यातील विविध शैक्षणिक संस्था आणि शासकीय आस्थापनांमध्येही आज 'वंदे मातरम्' गीताचं समूहगान आयोजित करण्यात येणार आहे.

वंदे मातरम् गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाचा एक भाग म्हणून पुण्यात आज एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी 'संगीत आनंदमठ' नाटकाचा प्रयोगही सादर होईल, तसंच वंदे

मातरम् ग्रंथाचं प्रकाशनही होणार आहे. वंदे मातरम गौरव समितीच्या वतीने पुण्यात उद्या वंदे मातरम गौरव यात्रा काढण्यात येणार आहे.

वंदे मातरम् गीताचे संशोधक आणि संगीत संग्राहक मिलिंद सबनीस यांनी आकाशवाणीशी बोलताना वंदे मातरम् गीताचं महत्त्व विशद केलं, ते म्हणाले

वंदे मातरम् गीताचे संशोधक आणि संगीत संग्राहक मिलिंद सबनीस यांची विशेष मुलाखत आज रात्री ८ वाजता दिल्लीवरुन प्रसारित होणार आहे. मुंबईसह राज्यातील सर्व केंद्रं ही मुलाखत सहक्षेपित करतील. त्यामुळे रात्री 8 वाजून 5 मिनिटांनी प्रसारित होणारं मराठी राष्ट्रीय बातमीपत्र आज रात्री 8 वाजून 30 मिनिटांनी प्रसारित होईल.

**<u>बिहारमतदान</u>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान काल पार पडलं. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत, विक्रमी 64 पूर्णांक 66 टक्के मतदानाची नोंद झाली. या टप्प्यात एकंदर 1 हजार 3 शे 14 उमेदवारांचं राजकीय भवितव्य ई व्ही एम मशीन मध्ये सीलबंद झालं आहे. या टप्प्यात, एकंदर 1 हजार 3 शे 14 उमेदवार निवडणूक रिंगणात असून, यात, उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, विजय कुमार सिन्हा, नितीश कुमार मंत्रिमंडळातील 16 मंत्री आणि महाआघाडीबंधनाचे उमेदवार आणि राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांचा समावेश आहे.

काही तुरळक घटना वगळता, मतदान शांततेत पार पडलं. लखीसराय जिल्ह्यात जमावानं उपमुख्यमंत्री आणि भाजपाचे उमेदवार विजयकुमार सिन्हा यांच्या ताफ्यावर, मतदान केंद्राजवळ हल्ला केला. या घटनेशी संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश निवडणूक आयोगानं पोलिस दलाल दिले आहेत.

निवडणूक आयोगाच्या आंतरराष्ट्रीय निवडणूक अभ्यागत कार्यक्रमांतर्गत सहा देशांतील प्रतिनिधींनी काल पाटणा, मुझफ्फरपूर, वैशाली आणि नालंदा या मतदान केंद्रांना भेट देऊन मतदान प्रक्रियेचं निरीक्षण केलं. मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणुका सुनिश्चित करण्यासाठी, निवडणूक आयोग करत असलेल्या उपाययोजनांची या प्रतिनिधींनी प्रशंसा केली.

**<u>सितारामन-स्टेटबँकअधिवेशन</u>**

भारताला मोठ्या आणि जागतिक दर्जाच्या बँकांची गरज आहे; आणि या संदर्भात काम सुरू झालं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितरामण यांनी केलं आहे. भारतीय स्टेट बँकेच्या वतीनं, काल मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या 12 व्या बँकिंग आणि अर्थशास्त्र परिषदेत त्या बोलत होत्या. केंद्र सरकारनं २०१४ पासून व्यवसाय सुलभतेसाठी असंख्य सुधारणात्मक उपाययोजना केल्या असून, धोरणात्मक सातत्य आणि पारदर्शकतेमुळे गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळालं असल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं. वस्तू आणि सेवा करात करण्यात आलेल्या दर कपातीमुळे उत्पादन क्षेत्रात मागणी आणि गुंतवणूक वाढेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उत्पादन आधारित प्रोत्साहन योजनेमुळे गेल्या मार्च महिन्यात,

देशाची निर्यात ६१ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त झाली असून, १२ लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती झाली आहे, अशी माहिती सितरमण यांनी दिली.

**शांतता-चर्चा**

पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील शांतता चर्चेला तुर्कीतल्या इस्तंबूल इथं काल पुन्हा सुरूवात झाली. दोन्ही देशांमधील तणाव आणखी वाढू नये यासाठी ही चर्चा आयोजित करण्यात आली आहे. नुकत्याच, गेल्या १५ ऑक्टोबरला उभय देशांनी युद्धबंदीवर सहमती दर्शवली होती, मात्र काल दोन्ही देशांच्या सीमेपलीकडून गोळीबार झाल्याचं वृत्त आहे.

पंतप्रधान-वाराणसीदौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या वाराणसीच्या दौऱ्यावर जात असून, त्यांच्या हस्ते चार 'वंदे भारत' रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा दाखवण्यात येईल. बनारस-खजुराहो, लखनौ-सहारणपुर, फिरोझपूर – दिल्ली, आणि एरनाकुलम – बेंगळुरू या मार्गांवर या रेल्वे गाड्या धावणार आहेत.

**'ईक्षक'जहाजअनावरण**

'ईक्षक' या टेहळणी जहाजाचा काल भारतीय नौदलात औपचारिकरित्या समावेश करण्यात आला. कोची येथील नौदलाच्या नाविक तळावर आयोजित कार्यक्रमात, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी यांच्या हस्ते हे जहाज नौदलाच्या सेवेत दाखल करण्यात आलं. 'टेहळणी जहाज' वर्गातील हे तिसरं सर्वात मोठं जहाज असून, या जहाजाच्या बांधणीत 80 टक्के स्वदेशी सामग्री वापरण्यात आली आहे. जहाजं, बंदरं, जलमार्ग, किनारपट्टी आणि खोल समुद्रातील टेहळणी करण्यात हे जहाज महत्वाची भूमिका बजावणार आहे.

**ऊर्जामंत्री**

राष्ट्रीय जलविद्युत महामंडळ अर्थात एन एच पी सीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल यांनी काल नवी दिल्लीत एका विशेष नाण्याचं प्रकाशन केलं. जलविद्युत प्रणालीचं महत्त्व आणि फायदे याबाबत जनजागृती करण्यासाठी हे नाणं तयार करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. याच अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या 'छोटा भीम और बडा बांध' या चित्रपुस्तिकेचंही प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आलं. गेल्या पाच दशकांमध्ये, एन एच पी सीनं आव्हानात्मक प्रदेशांमध्ये जलविद्युत प्रकल्प राबवले असून सौर, पवन आणि हरित हायड्रोजनमध्ये विविधता आणली आहे असं मनोहर लाल पुढे म्हणाले.

**फिडे-बुद्धिबळस्पर्धा**

गोव्यात सुरू असलेल्या 'फिडे विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत' आठ भारतीय खेळाडू तिसऱ्या फेरीत दाखल होण्यासाठी, आज दुसऱ्या फेरीत टाय-ब्रेक मध्ये खेळतील. तर, डी. गुकेश, अर्जुन एरिगसी यांच्यासह पाच खेळाडू या आधीच तिसऱ्या फेरीत दाखल झाले आहेत.

**<u>हॉकी</u>**

भारतीय हॉकीच्या गौरवशाली शंभर वर्षांचा उत्सव आज देशभर साजरा करण्यात येणार आहे. शताब्दी समारंभाच्या निमित्तानं, ५५० जिल्ह्यांमध्ये १४०० हून अधिक सामने आयोजित करण्यात आले आहेत. मुख्य कार्यक्रम आज सकाळी साडे आठ वाजता नवी दिल्लीतल्या मेजर ध्यानचंद राष्ट्रीय मैदानावर होईल, यामध्ये भारतीय हॉकीचा गौरवशाली प्रवास दाखवणारे विशेष कार्यक्रम होतील. हॉकी इंडियाच्या पुरुष आणि महिला खेळाडूंचा समावेश असलेला विशेष सामना यावेळी होणार आहे. या कार्यक्रमात हॉकीमध्ये उल्लेखनीय योगदान दिलेल्या दिग्गजांचा सत्कार, "भारतीय हॉकीची शंभर वर्षे" या खंडाचं प्रकाशन, तसंच भारतीय हॉकीच्या शतकी वाटचालीचा आढावा घेणाऱ्या छायाचित्र प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>राष्ट्रपतीटीमइंडिया</u>**

विश्वविजेत्या भारतीय महिला क्रिकेट संघानं काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांची नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात भेट घेतली. भारतीय चमूचं अभिनंद करत, भारतीय संघानं इतिहास घडवला असून, हा विजय आणि यात सहभागी खेळाडू, तरुण पिढीसाठी आदर्श ठरले असल्याचं राष्ट्रपति यावेळी म्हणाल्या. भारतीय महिला संघानं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. या खेळाडूंनी 'फिट इंडियाचा' संदेश सर्वत्र पोहोचवावा, तसंच तंदुरुस्त राहण्यासाठी तरुणांना प्रोत्साहित करावं, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

**<u>क्रिकेट</u>**

ऑस्ट्रेलियात कॅररा इथं झालेल्या चौथ्या 20 षटकांच्या सामन्यात भारतानं काल ऑस्ट्रेलियावर ४८ धावांनी विजय मिळवला. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजी दिली. भारतानं निर्धारित २० षटकात ८ गडी बाद १६७ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ ११९ धावात गारद झाला.पाच सामन्यांच्या या मालिकेत भारतानं २-१ अशी आघाडी घेतली आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.